# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 25/12/2021 (शनिवार)

(दुपार)

---

### निष्काळजीपणामुळे मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 04 कि.मी. अंतरावरील महाक्रेट पाईप इंडस्टीज कंपनी मौजा सिर्साावाडी येथे दिनांक 24/12/2021 चे सकाळी 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अमित रिंके पोलीस स्टेशन काटोल हे डयुटीवर हजर असतांना ग्रामीण रूग्णालय काटोल येथून फोनव्दारे माहिती मिळाली की, चंदन जगदीश शहा (मृतक) वय 15 वर्षे रा. भिमपुर जि. सुप्रॉल रा. बिहार याला मृत अवस्थेत आणले आहे. यावरून सपोनि चैधरी व पो स्टे स्टॉप सह मृतकाचा ईन्क्वेस्ट पंचनामा केला यातील घटना ता वेळी ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरेची पाहणी केली असता यातील मृतक हा हातात सब्बल घेवून सिमेंटचे पाईप सरकवित असतांना मृतक खाली पडल्याने त्याचे अंगावर सिमेंटचे पाईप घसरत असतांना दिसून आले. सदरवेळी मृतक याचे अंगावर स्वताचे जिवीताचे संरक्षण संबंधाने हेल्मेट किंवा इतर कोणतेही साहीत्य दिसून आले नाही. सर्व कामकाज कंपनीचे आरोपी मॅनेजर नामे– विपूल कूमार देवाजीभाई भादानी वय 32 वर्ष रा सूलतानपूर तगोडंल जि राजकोट ह.मू. महाक्रेट पाईप इंडस्टीज कंपनी मौजा सिर्साावाडी ता काटोल हा बघत असल्याची माहिती प्राप्त झाली. सदरचे कामकाज धोकादायक असल्याची कंपनीचे आरोपी मॅनेजर याला पूर्ण जाणीव आहे. सदर धोकादायक काम करित असतांना दुर्घटनेमध्ये जिव जावू शकतो तरी सुध्दा यातील मृतक अल्पवयीन असून सुध्दा त्यास अवजड कामाचे प्रशिक्षण नसतांना काम करण्यास लावल्यामुळे त्याचे अंगावर सिमेंटचे पाईप पडले. त्यामुळे कंपणीचे आरोपी मॅनेजर हा जबाबदार असल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक अमित रिंके पोस्टे काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री मनोज चौधरी हे करीत आहे.

### अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत प्रीन्स बार समोर खापरखेडा येथे दिनांक 24/12/2021 चे 18:30 वा. दरम्यान आरोपी नामे– निखील अनिलराव शेटे, वय 21 वर्ष, रा. हिंगणा वार्ड क 05 हा चेमरी गेट हाउस समोरील प्रीन्स बार मध्ये दारू पीवुन बारच्या बाहेर आम रस्त्यावर कमरेला चाकु सारखे धातक शस्त्रबाळगुन हस्तक्षपनिय गुन्हा करण्याचा उद्देशाने मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे सहायक फौजदार जानुसिंग जाधव पो.स्टे खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक प्रमोद भोयर मो.क. 9552552074 हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर